# श्री बावनश्लोकी गुरूचरीत्र

---

श्रीगणेशाय नमः । श्रीमद्दत्तात्रेयगुरवे नमः ॥

अथ ध्यानम् ॥श्   लोक॥

दिगंबरं भस्मसुगंधलेपनं चक्रं त्रिशूलं डमरुं गदां च ।

पद्मासनस्थं रविसोमनेत्रम दत्तात्रयं ध्यानमभीष्टसिद्धिदम् ॥१॥

काषायवस्त्रं करदंडधारिणं कमंडलुं पद्मकरेण शंखं ।

चक्रं गदाभूषितभूषणाढयं श्रीपादराजं शरणं प्रपद्ये ॥२॥

कृते जनार्दनो देवस्त्रेतायां रघुनन्दनः ।

द्वापरे रामकृष्णौ च कलौ श्रीपादवल्लभः ॥३॥

## गुरुचरित्र

ॐ नमोजी विघ्नहरा । गजानना गिरिजाकुमरा ।

जयजयाजी लंबोदरा । एकदंता शूर्पकर्णा ॥१॥

श्‍ लोक ॥ त्रिमूर्तिराजा गुरु तूंचि माझा । कृष्णातिरीं वास करुनि बोजा ।

सद्भक्त तेथें करिती आनंदा । त्या देव स्वर्गीं बघती विनोदा ॥२॥

जयजयाजी सिद्धमुनी । तूं तारक भवार्णवातुनी ।

संदेह होता माझे मनीं । आजि तुवां कुडें केलें ॥३॥

ऐशी शिष्याची विनंती । ऐकूनि सिद्ध काय बोलती ।

साधु साधु तुझी भक्ति । प्रीती पावो श्रीगुरुचरणीं ॥४॥

भक्तजन रक्षणार्थ । अवतरला श्रीगुरुनाथ ।

सगरपुत्रा कारणें भगीरथें । गंगा आणिली भूमंडळीं ॥५॥

तीर्थें असती अपार परी । समस्त सांडूनि प्रीति करी कैसा पावला श्रीदत्तात्री । श्रीपादश्रीवल्लभ ॥६॥

ज्यावरीं असे श्रीगुरुची प्रीति । तीर्थमहिमा ऐकावया चित्तीं
।
वांछा होतसे त्या ज्ञानज्योती । कृपामूर्ति गुरुराया ॥७॥
गोकर्णक्षेत्रीं श्रीपादयती । राहिले तीन वर्षें गुप्   ती ।
तेथूनि गुरु गिरिपुरा येती । लोकानुग्रहाकारणें ॥८॥
श्रीपाद कुरवपुरीं असताम । पुढें वर्तली कैसी कथा ।
विस्तारुनि सांग आतां । कृपामूर्ति दातारा ॥९॥

सिद्ध म्हणे नामधारकासी । श्रीगुरुमहिमा काय पुससी ।
अनंतरुपें परियेसी । विश्वव्यापक परमात्मा ॥१०॥
सिद्ध म्हणे ऐक वत्सा । अवतार झाला श्रीपाद हर्षा ।
पूर्व वृत्तांत ऐकिला ऐसा । कथा सांगितली विप्रस्त्रियेची
॥११॥
श्रीगुरु म्हणती जननीसी । आम्हां ऐसा निरोप देसी ।
अनित्य शरीर तूं जाणसी । काय भंरवसा जीवित्वाचा
॥१२॥

श्रीगुरुचरित्र कथामृत । सेवितां वांछा अधिक होत ।
शमन करणार समर्थ । तूंचि एक कृपासिंधु ॥१३॥
ऐकूनि शिष्याचें वचन । संतोष करी सिद्ध आपण ।
श्रीगुरुचरित्र कामधेनु जाण । सांगता झाला विस्तारें ॥१४॥
ऐक शिष्या शिरोमणी । धन्य धन्य तुझी वाणी ।
तुझी भक्ति श्रीगुरुचरणीं । लीन झाली परियेसी ॥१५॥

विनवी शिष्य नामांकित । सिद्ध योगियातें पुसत ।
सांग स्वामी वृत्तांत । श्रीगुरुचरित्र विस्तारें ॥१६॥
ऐक शिष्या नामकरनी । श्रीगुरुभक्त शिखामणी ।
तुझी भक्ति श्रीगुरुचरणीं । लीन झाली निर्धारें ॥१७॥
ध्यान लागलें श्रीगुरुचरणीं । तृप्   ति नोहे अंतःकरणीं
कथामृत संजीवनी ।
आणिक निरोपाची दातारा ॥१८॥
अज्ञान तिमिर रजनींत । निजलो होतो मदोन्मत्त ।

श्री गुरुचरित्र वचनामृत । प्राशन केलें दातारा ॥१९॥
स्वामी निरोपिलें आम्हांसी । श्रीगुरु आले गाणगापुरासी ।
गौप्यरुपें अमरपुरासी । औदुंबरीं असती जाण ॥२०॥
सिद्ध म्हणे नामधारका । ब्रह्मचारी कारणिका ।
उपदेशी ज्ञान विवेका । तये प्रेंत जननीसी ॥२१॥
तुझा चरणसंपर्क होता । झालें ज्ञान मज आतां ।
परमार्थीं मन ऐकतां । झालें तुझें प्रसादें ॥२२॥
लोटांगणें श्रीगुरुसी । जाऊनि राजा भक्   तीसीं ।
नमस्कारी विनयेसी । एकभावें करुनियां ॥२३॥
शिष्यवचन परिसुनी । सांगता झाला सिद्धमुनी ।
ऐक भक्ता नामकरणी । श्रीगुरुचरित्र अभिनव ॥२४॥
सिद्ध म्हणे ऐक बाळा । श्रीगुरुची अगम्य लीला ।
सांगतां न सरे बहुकाळा । साधारण मी सांगतसे ॥२५॥
श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी । नको भ्रमू रे युक्   तीसी ।
वेदांत न कळे ब्रह्मायासी । अनंत वेद असती जाण ॥२६॥

चतुर्वेद विस्तारेंसी । श्रीगुरु सांगती विप्रासी ।

पुढें कथा वर्तली कैसी । विस्तारावी दातारा ॥२७॥

नामधारक म्हणे सिद्धासी । पुढील कथा सांगा आम्हांसी ।

उल्हास होतो माझे मानसीं । श्रीगुरुचरित्र अति गोड ॥२८॥

पुढें कथा कवणेपरी । झाली असे गुरुचरित्रीं । निरुपावें विस्तारीं ।

सिद्धमुनी कृपासिंधू ॥२९॥

श्रीगुरुचरित्र सुधारस । तुम्हीं पाजिला आम्हांस ।

परि तृ प् त नव्हे गा मानस । तृषा आणिक होतसे ॥३०॥

सिद्ध म्हणे नामधारका । पुढें अपूर्व झालें ऐका ।

योगेश्वर कारणिका । सांगे स्त्रियांचे स्वधर्म ॥३१॥

पतिव्रतेच्या रीती । सांगे देवांसी बृहस्पती ।

सहगमनाची फलश्रुती । येणें परी निरुपिली ॥३२॥

श्रीगुरु आले मठासी । पुढें कथा वर्तली कैसी ।

विस्तारुनि आम्हांसी । निरुपावें स्वामिया ॥३३॥

श्रीगुरु म्हणती दंपतीसी । ऐका पाराशरऋषि ।

तया काश्‌ मीररायासी । रुद्राक्षमहिमा निरुपिला ॥३४॥

पुढें कथा कैसी वर्तली । विस्तारुनि सांगा वहिली ।

मति असे माझी वेधिली । श्रीगुरुचरित्र ऐकावया ॥३५॥

गाणगापुरीं असतां श्रीगुरु । महिमा झाला अपरंपारु ।

सांगतां न ये विस्तारु । तावन्मात्र सांगतसे ॥३६॥

ऐसा श्रीगुरु दातारु । भक्तजनां कल्पतरु ।

सांगतां झाला आचारु । कृपा करुनि विप्रांसी ॥३७॥

आत झालों मी तृषेचा । घोट भरवीं गा अमृताचा ।

चरित्रभाग सांगें श्रीगुरुचा । माझें मन निववीं वेगीं ॥३८॥

सिद्ध म्हणे नामधारका । पुढें अपूर्व झालें ऐका ।

साठ वर्षें वांझ देखा । पुत्रकन्या प्रसवली ॥३९॥

सिद्ध म्हणे नामधारका । अपूर्व वर्तलें आणिक ऐका ।

वृक्ष झाला काष्ट सुका । विचित्र कथा परियेसा ॥४०॥

जयजयाजी सिद्धमुनी । तूं तारक या भवार्णवांतुनी ।
नाना धर्म विस्तारुनि । श्रीगुरुचरित्र निरुपिलें ॥४१॥
मागें कथा निरुपिलें । सायंदेव शिष्य भले ।
श्रीगुरुंनीं त्यासी निरुपिलें । कलत्रपुत्र आणि म्हणती ॥४२॥
श्रीगुरु म्हणती द्विजांसी । या अनंत व्रतासी ।
सांगेन ऐका तुम्हांसी । पूर्वीं बहुतीं आराधिलें ॥४३॥
श्रीगुरु माझा मल्लिकार्जुन । पर्वत म्हणजे श्रीगुरुभवन ।
आपण नये आतां येथून । सोडूनि चरण श्रीगुरुचे ॥४४॥
तूं भेटलासी मज तारक । दैन्य गेले सकळहि दुःख ।
सर्वाभीष्ट लाधलें सुख । श्रीगुरुचरित्र ऐकतां ॥४५॥
गाणगापुरीं असतां श्रीगुरु । ख्याति झाली अपारु ।
लोक येती थोरथोरु । भक्त बहुत झाले असती ॥४६॥
सांगेन ऐका कथा विचित्र । जेणें होय पतित पवित्र ।
ऐसें हें श्रीगुरुचरित्र । तत्त्परतेसी परियेसा ॥४७॥
श्रीगुरु नित्य संगमासी । जात होते अनुष्ठानासी ।

मार्गांत शूद्र परियेसी । शेतीं आपुल्या उभा असे ॥४८॥

त्रिमूर्तींचा अवतार । वेषधारी झाला नर ।

राहिलें प्रीतीं गाणगापुर । कवण क्षेत्र म्हणूनियां ॥४९॥

तेणें मागितला वर । राज्यपद धुरंधर ।

प्रसन्न झाला त्यासी गुरुवर । दिधला वर परियेसा ॥५०॥

राजभेटी घेउनी । श्रीपाद आले गाणगाभुवनीं ।

योजना करिती आपुले मनीं । गौप्य रहावें म्हणूनियां ॥५१॥

म्हणे सरस्वती गंगाधर । श्रोतयां करी नमस्कार ।

कथा ऐका मनोहर । सकळाभीष्ट साधेल ॥५२॥

इति श्रीगुरुचरित्रकथाकल्पतरौ सिद्धनामधारकसंवादे द्विपंचाशत् श्   लोकात्मकं गुरुचरित्रं संपूर्णम् ॥

================================

संकलन व PDF by :- श्रीधर कुलकर्णी